गुरुवार, दि. १२ फेब्रुवारी २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक १६४ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अ‍ॅण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# कदीम जालना पोलीसांना मुहूर्त मिळेना

## हल्ल्याची वाट पाहतेय काय पोलीस?; पत्रकार भरत मानकर तक्रार प्रकरणी अद्याप गुन्हा दाखल नाही

**जालना | प्रतिनिधी -** लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेल्या पत्रकारितेवर थेट हल्ला झाल्याची धक्कादायक घटना आज जालना जिल्हा परिषद कार्यालयात घडली. बातमीच्या अनुषंगाने माहिती घेत असताना एका गुत्तेदाराने पत्रकारास अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करत धक्काबुक्की व जीवे मारण्याची धमकी देण्यात आली होती. या संदर्भात सोमवार (दि.२) रोजी दैनिक जनश्वासचे संपादक भरत मानकर यांनी रितसर तक्रार कदीम जालना पोलीस ठाणे येथे पोलीस निरीक्षक जर्नाधन शेवाळे यांची भेट घेऊन दिली होती. या तक्रारीला दहा दिवस होत आले असून अद्याप पर्यंत पोलीसांनी एफआयआर दाखल केला नसल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. कदीम जालना पोलीसांना गुन्हा दाखल करण्यास विलंब होत आहे की, जाणूनबुजून विलंब करण्यात येत आहे असा प्रश्न निर्माण झाला आहे. महत्त्वाचे म्हणजे ज्या श्री बांगड विरोधात तक्रार दाखल करण्यात आली आहे. त्या श्री बांगड विरोधात अंबड पोलीस ठाण्यात यापुर्वी पत्रकारांला धमकावल्याबाबत तक्रार देण्यात आली होती. त्यावेळीही पोलीसांनी प्रकरण मिटवून घेण्यावर भर दिला होता.

यासंदर्भात अधिक माहिती अशी की, सोमवार, दि. २ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी १ ते १.३० वाजेच्या सुमारास दैनिक जनश्वासचे संपादक भरत गणपतराव मानकर हे जिल्हा परिषद बांधकाम विभागातील सहाय्यक लेखाधिकारी श्री. हारुण यांच्या कॅबिनमध्ये एका बातमीच्या संदर्भात माहिती घेत बसले होते. त्यावेळी श्री. बांगड नावाचा गुत्तेदार अचानक तेथे आला.

प्रत्यक्षदर्शींच्या माहितीनुसार, संबंधित गुत्तेदाराने अत्यंत गलिच्छ, अश्लील व अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करत, ''कोण मादर.. पत्रकार आहे हा आमचे बिल रोखण्याचा प्रयत्न करतो त्याचे हातपाय तोडून टाकू याला लय मस्ती आली आहे'' अशा धमकीवजा शब्दांचा वापर केला. इतकेच नव्हे तर पत्रकार मानकर यांना प्रत्यक्ष धक्काबुक्की करत कार्यालयातून हाकलून देण्याचा प्रयत्न करण्यात आला होता.

या घटनेमागे केवळ वैयक्तिक राग नसून, बांधकाम विभागातील कामांच्या चौकशीची भीती होती. पत्रकार मानकर हे संबंधित गुत्तेदाराच्या कामांबाबत माहिती घेत होते, त्यामुळे संभाव्य अनियमितता उघडकीस येण्याच्या भीतीनेच ही धक्काबुक्की व जीवे मारण्याची धमकी करण्यात आल्याचा संशय व्यक्त होत होता. यासोबतच, पत्रकार कार्यालयात आल्याची तसेच कोणत्या कामाबाबत चौकशी करत आहेत, याची माहिती गुत्तेदारास नेमकी कोणत्या कर्मचारी अथवा अधिकाऱ्याने दिली, याची सखोल चौकशी होणे अत्यावश्यक असल्याची मागणी करण्यात आली होती.

श्री बांगड यांच्यावर अंबड पोलीस ठाण्यात पत्रकार गणेश जाधव यांनी तक्रार दिली होती. त्यावेळी पोलीसांनी श्री बांगड यांचा जबाब नोंदवून घेतला होता. त्या जबाबात श्री बांगड यांनी पत्रकार गणेश जाधव यास गजानन शिंदे यांच्या कॉन्फरन्स कॉलवरून रागाच्या भरात शिवीगाळ केल्याचे मान्य ही केले होते. गैरसमजुतीतून प्रकार घडल्याचे सांगत गणेश जाधव यांची माफी मागीतल्याचे सांगत जबाबात स्पष्ट नमूद आहे. हा प्रकार म्हणजे एक प्रकारे समेट घडवून आणण्याचा प्रकार म्हणता येईल. पत्रकार गणेश जाधव नंतर आता पत्रकार भरत मानकर यांना श्री बांगड यांनी अर्वाच्च भाषेत शिवीगाळ करून धक्काबुक्की केली. हा प्रकार निंदणीय आहे. श्री मानकर यांच्या तक्रारीनंतर आम आदमी पक्षाचे सुभाष बोर्डे यांनीही पोलीस प्रशासनाला श्री बांगड यांच्यावर कारवाई करण्यासंदर्भात निवेदन दिले. प्रेस कॉन्सील ऑफ महाराष्ट्र जालना जिल्ह्याच्यावतीने ही पोलीस अधिक्षकांना निवेदन देऊन तत्काळ पत्रकार संरक्षण कायद्यातंर्गत गुन्हा दाखल करण्याची मागणी पत्रकारांच्या शिष्टमंडळाने केली. विशेष म्हजणे येत्या १६ फेब्रुवारीपासून आंदोलनाचा ईशाराही संघटनेने दिला होता. तसेच व्हॉईस ऑफ मिडीयाच्या शिष्टमंडळानेही जिल्हा परिषदेच्या अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी व कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांची भेट घेत संबंधीत गुत्तेदारांची बिले अदा न करता संपूर्ण कामाची चौकशी करण्याची मागणी केलेली आहे.

सर्व घटनाक्रम पाहता पोलीसांनी तातडीने चौकशी करुन गुन्हा दाखल करणे आवश्यक असतांना केवळ प्रकरण चौकशीच्या फेऱ्यात अडकवून ठेवले आहे. आता पोलीस काय संबंधीत गुत्तेदाराकडून पत्रकार भरत मानकर यांच्यावर हल्ला होण्याची किंवा त्यांचे हात पाय तोडण्याची वाट पाहत आहे का? असे झाल्यानंतरच पोलीस गुन्हा दाखल करतील का? असा प्रश्न उपस्थित होत आहे. जालना शहर व जिल्हाभरात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे. खुनाच्या घटना दिवसेंदिवस वाढत आहे. अशा वेळी पोलीसांनी धक्काबुक्की आणि धमक्यांच्या तक्रारींची वेळीच दखल घेणे आवश्यक आहे. असे असले तरी कदीम जालना पोलीस ठाणे नेमके कशाची वाट पाहत आहे हे न समजण्या सारखे आहे.

महाराष्ट्रात पत्रकार संरक्षण कायदा अस्तित्वात असतांनाही अशा प्रकारच्या घटना घडत आहेत. तर हा कायदा केवळ कागदावरच आहे का? असा प्रश्न आता उपस्थित होत आहे. पत्रकारावर हल्ला करणे म्हणजे थेट लोकशाहीवर हल्ला असल्याचे मत ज्येष्ठ पत्रकारांनी व्यक्त केले आहे. पत्रकार मानकर यांनी कदीम जालना पोलीस ठाण्यात लेखी तक्रार दाखल करतात, गुत्तेदार श्री. बांगड यांच्यावर पत्रकार संरक्षण कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करावा, त्यांच्यापासून स्वतःस व दैनिकाच्या प्रतिनिधींना संरक्षण द्यावे, माहिती लीक करणाऱ्या कर्मचाऱ्याची चौकशी करून त्याच्यावरही कारवाई करावी, अशी मागणी केली. यास दहा दिवसांचा वेळ झाल्यानंतरही गुन्हा दाखल होत नाही. कदीम जालना पोलीस कोणत्या दिवसाची वाट पाहत आहे. त्यांना मुहूर्त मिळत नाही का? असा प्रश्न उपस्थित होतो आहे.

**पत्रकार संघटनांचा इशारा**

या घटनेनंतर जालना जिल्ह्यातील पत्रकार संघटना आक्रमक झाल्या असून, तात्काळ कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा प्रेस कॉन्सील ऑफ महाराष्ट्र जालना जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष दीपक शेळके यांनी दिला आहे. ''आज एका पत्रकारावर हल्ला झाला आहे, उद्या हा धोका प्रत्येकावर येऊ शकतो,'' त्यामुळे पत्रकारांनी संघटीत होऊन कारवाई करण्यासाठी एकजूट दाखवावी. गुन्हा दाखल न झाल्यास येत्या १६ तारखेपासून पोलीस अधिक्षक कार्यालयासमारे लक्षवेधी आंदोलन करण्याचा ईशाराही श्री शेळके यांनी दिला आहे.

ही घटना केवळ कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न नसून, भ्रष्टाचारविरोधी लढ्याशी निगडित आहे. प्रशासनाने या प्रकरणात किती गांभीर्याने दखल घेतली, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. जर अशा गुंड प्रवृत्तीच्या लोकांवर वेळीच कारवाई झाली नाही, तर पत्रकार निर्भयपणे काम कसे करणार? असा प्रश्न उपस्थित होत असून, तात्काळ कठोर कारवाई हीच लोकशाहीच्या संरक्षणाची हमी ठरेल.

# जालना शहरातील विविध प्रभागात आमदार अर्जुन खोतकर यांचा विकास कामाचा धडाका

**जालना | प्रतिनिधी -** जालना शहरातील प्रभाग क्रमांक १६ मध्ये विविध विकासकामांचा शुभारंभ आज मोठ्या उत्साहात पार पडला. अंदाजे दीड कोटी रुपयांच्या या विकासकामांचा शुभारंभ शिवसेना उपनेते तथा आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या हस्ते करण्यात आला. या कामांमुळे परिसरातील नागरिकांना पावसाळ्यातील चिखल, पाणी साचणे व दुर्गंधीच्या समस्यांपासून मोठा दिलासा मिळणार असून परिसराच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळणार आहे.

प्रभाग क्रमांक १६ मधील विविध भागांमध्ये रस्ते, नाली, सभामंडप व संरक्षण भिंत अशा मूलभूत सुविधा उभारण्यात येत आहेत.

श्री सुशील ढाकणे यांच्या घरापासून घुगे तलाठी यांच्या घरापर्यंत १५ लाख रुपये खर्चून सिमेंट रस्त्याचे भूमिपूजन करण्यात आले.

सौ. सविता भोसले यांच्या घरापासून देवकर यांच्या घरापर्यंत १५ लाख रुपयांच्या सिमेंट रस्त्याच्या कामाचा शुभारंभ झाला. शिवदत्त हाऊसिंग सोसायटी येथे मोकळ्या जागेवर २० लाख रुपये खर्चून खुले सभामंडप उभारण्यात येणार आहे.

वैजीनाथ नगर येथे ३० लाख रुपये खर्चून संरक्षण भिंत बांधकामाचे भूमिपूजन करण्यात आले.

समर्थ सोसायटी येथे श्री परळकर यांच्या घरापासून तारक सर यांच्या घरापर्यंत ३० लाख रुपये खर्चून सिमेंट रस्ता व भूमिगत नाली बांधकाम हाती घेण्यात आले आहे.

ओजस कॉलनी येथे २५ लाख रुपये खर्चून सिमेंट रस्ता व फेवर ब्लॉक बसविण्याच्या कामाचा शुभारंभ करण्यात आला.



या प्रसंगी उपस्थित नागरिकांशी संवाद साधताना आमदार अर्जुनराव खोतकर म्हणाले, प्रभाग क्रमांक १६ मधील ही सर्व विकासकामे केवळ रस्ते किंवा भिंती उभारण्यापुरती मर्यादित नसून नागरिकांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडवून आणणारी आहेत. पावसाळ्यात चिखल, पाणी साचणे, दुर्गंधी यांसारख्या समस्या अनेक वर्षांपासून नागरिकांना भेडसावत होत्या. त्या समस्या कायमस्वरूपी दूर करण्यासाठी दर्जेदार सिमेंट रस्ते व भूमिगत नाली व्यवस्था उभारली जात आहे.


आपल्या मतदारसंघातील प्रत्येक प्रभागाचा सर्वांगीण विकास हा आमचा ध्यास आहे. कोणताही भाग विकासापासून वंचित राहू नये, यासाठी नियोजनबद्ध पद्धतीने निधी उपलब्ध करून कामे मंजूर केली जात आहेत. नागरिकांनी मांडलेल्या अडचणी, स्थानिक लोकप्रतिनिधींनी केलेला पाठपुरावा आणि प्रशासनाच्या सहकार्यामुळे ही कामे शक्य झाली आहेत.

शिवदत्त हाऊसिंग सोसायटीतील सभामंडप उभारणीमुळे सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक कार्यक्रमांसाठी **पान २ वर**

# शासकीय कार्यालयात 'विना हेल्मेट' प्रवेशाला बंदी

## जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांचे कडक आदेश

**जालना | प्रतिनिधी -** जालना जिल्ह्यात रस्ते अपघातांचे वाढते प्रमाण आणि त्यामध्ये होणारी प्राणहानी रोखण्यासाठी जिल्हा प्रशासनाने कडक पावले उचलली आहेत. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी आज एका विशेष परिपत्रकाद्वारे जिल्ह्यातील सर्व शासकीय अधिकारी, कर्मचारी आणि अभ्यागतांना दुचाकी चालवताना 'आय.एस.आय.' मार्क असलेले हेल्मेट परिधान करणे बंधनकारक केले आहे. तरी रस्ते सुरक्षेसाठी नागरिकांनी आणि शासकीय अधिकारी-कर्मचाऱ्यांनी या मोहिमेला सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले आहे.



जालना मुख्यालयातील सर्व शासकीय कार्यालयांच्या अधिकारी - कर्मचाऱ्यांना दुचाकी चालविताना हेल्मेट वापरणे आता अनिवार्य असेल. जिल्हाधिकारी कार्यालय परिसर तसेच सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालयांमध्ये हेल्मेट परिधान केलेल्या व्यक्तींनाच (कर्मचारी व अभ्यागत) प्रवेश दिला जाईल. प्रत्येक कार्यालयाच्या प्रवेशद्वारावर सुरक्षा रक्षकांमार्फत तपासणी केली जाईल. हेल्मेट नसलेल्या व्यक्तींना कार्यालय परिसरात वाहन लावण्यास सक्त मनाई असेल. या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध पोलीस प्रशासन आणि प्रादेशिक परिवहन विभागामार्फत मोटर वाहन कायद्यानुसार दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे.

कार्यालय प्रमुखांनी आपल्या कर्मचाऱ्यांना या नियमाची माहिती देऊन त्याची काटेकोर अंमलबजावणी सुनिश्चित करावी, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या अधिकारी -कर्मचाऱ्यांवर प्रशासकीय कारवाई प्रस्तावित करण्यात येईल, असा इशाराही **पान २ वर**

नैसर्गिक अनुदान घोटाळा

# सुकन्या गवते अटक

**जालना | प्रतिनिधी -** जिल्ह्यातील अंबड व घनसावंगी तालुक्यात झालेल्या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. यानंतर शासनाने शेतकऱ्यांना आर्थिक मदत जाहीर केली होती, परंतु या अनुदान प्रक्रियेतील अनेक अधिकारी-कर्मचाऱ्यांनी बोगस (नसलेल्या शेतकऱ्यांचे) नावे अनुदान यादीत समाविष्ट केली होती आणि त्याद्वारे शासनाच्या रकमेचा अपहार केला.

प्रकरणावर लक्ष ठेवण्यासाठी जिल्हाधिकारी यांनी चौकशी समिती गठीत केली, ज्यामध्ये २४० गावांमध्ये रु २४,९०,७७,८११/- इतक्या रकमेचा अपहार झाल्याचे उघड झाले. यानंतर अंबड पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला. आर्थिक गुन्हे शाखेच्या तपासानुसार, यापूर्वी ३५ आरोपींना अटक केली गेली आहे आणि त्यांना उच्च न्यायालयाने जामीन फेटाळला आहे.


अत्यंत महत्त्वाची अटक सुकन्या गवते या महिला तलाठीची झाली आहे. सुकन्या गवते, वय ३२, अंबड तहसील कार्यालयातील तलाठी (ग्राम महसुल अधिकारी) असताना तिने या घोटाळ्यात सहभाग घेतला. ती जालना शहरात आली होती आणि त्यानंतर तिला अटक करण्यात आली. आरोपीला २ दिवसांची पोलीस कस्टडी मंजूर करण्यात आली आहे. या प्रकरणात **पान २ वर**

# ग्रामपंचायतींवर प्रशासक म्हणून विद्यमान सरपंच व ग्रामपंचायत सदस्य यांचा पदभार कायम ठेवा

## आमदार बबनराव लोणीकर यांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मागणी

**जालना | प्रतिनिधी -** राज्यात जानेवारी २०२६ ते डिसेंबर २०२६ या कालावधीत मोठ्या संख्येने ग्राम पंचायतींची मुदत संपत आहे. ग्राम विकास विभागाच्या दि. २३ जानेवारी २०२६ च्या पत्रानुसार या ग्राम पंचायतींवर विस्तार अधिकाऱ्यांना प्रशासक म्हणून नेमण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत.परंतु सरपंच व ग्रामपंचायत सदस्य यांनाच प्रशासक म्हणून तात्पुरता पदभार सुरू ठेवू देणे हे कायदेशीर, लोकशाहीदृष्ट्या योग्य आणि प्रशासनाच्या अधिक हिताचे असून ग्रामपंचायतींवर प्रशासक म्हणून विद्यमान सरपंच व ग्रामपंचायत सदस्य यांचा पदभार कायम ठेवा अशी मागणी माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

भारतीय संविधानाच्या ७३व्या घटनादुरुस्तीने ग्रामपंचायतींना लोकशाही स्वरूप देण्यात आले असून अनुच्छेद २४३ (ई) नुसार ग्रामपंचायतींचा कार्यकाळ पाच वर्षांचा असून निवडणुका वेळेत होणे बंधनकारक आहे. तसेच निवडून दिलेल्या प्रतिनिधींमार्फतच स्थानिक स्वराज्य संस्थांचा कारभार चालवणे हे संविधानाचे मूलभूत तत्त्व आहे. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५९ च्या तरतुदीनुसार प्रशासक नेमणे ही एक तात्पुरती व अपवादात्मक व्यवस्था असून, ती केवळ निवडून आलेली संस्था अस्तित्वात नसताना वापरणे अपेक्षित आहे. अशा परिस्थितीतही, लोकशाही भावनेला धक्का न लावता स्थानिक लोकप्रतिनिधींनाच प्राधान्य देणे हे कायद्याच्या उद्देशाशी सुसंगत ठरते असेही आमदार बबनराव लोणीकर यांनी पत्रात म्हटले आहे.



मुंबई उच्च न्यायालयाने दि. १४ ऑगस्ट २०१४ रोजी दिलेल्या आदेशामध्ये देखील लोकशाही व्यवस्थेचा सन्मान राखत प्रशासकीय निर्णय घेतले जावेत असे स्पष्ट केले आहे. त्या आदेशाचा उद्देश प्रशासकीय अडथळे टाळणे हा असून, लोकप्रतिनिधींना पूर्णतः बाजूला सारणे हा नाही, ही बाब देखील प्रशासनाने लक्षात घेणे आवश्यक आहे. सध्या कार्यरत असलेले सरपंच व ग्रामपंचायत सदस्य हे ग्रामपंचायतींच्या आर्थिक व्यवहार, विकास कामे, योजनांची अंमलबजावणी, मालमत्ता नोंदी, कर वसुली तसेच लोकांच्या तक्रारी यासंबंधी पूर्णतः जाणकार आहेत. त्यामुळे त्यांच्याऐवजी बाह्य विस्तार अधिकाऱ्यांची नेमणूक केल्यास प्रशासनात अनावश्यक विलंब, तांत्रिक चुका व लोकांमध्ये असंतोष **पान २ वर**

# संपादकीय पान

## उत्क्रांतीवादाचा जनक

उत्क्रांती वादाचा जनक असे ज्यांना समजले जाते त्या चार्ल्स रॉबर्ट डार्विन यांचा आज जन्मदिन. चार्ल्स डार्विन हे विख्यात जीवशास्त्रज्ञ होते. त्यांनी मांडलेल्या उत्क्रांतीवादाच्या सिद्धांतात जगातील जीवसृष्टीची उत्पत्ती व विकासाची कशी प्रगती होत गेली हे शास्त्रशुद्धरित्या उलगडून दाखवले. चार्ल्स डार्विन यांचा जन्म १२ फेब्रुवारी १८०९ रोजी इंग्लंडमधील श्रॉपशायर परगण्यात झाला.त्यांचे वडील रॉबर्ट डॉक्टर तर आजोबा इमर्सन शास्त्रज्ञ होते. शालेय जीवनात त्यांना रसायन शास्त्राची खूप आवड होती म्हणून आपल्या भावाच्या मदतीने त्यांनी आपल्या घराबाहेर एक छोटीशी प्रयोगशाळा उभारली होती तिथे ते तासनतास प्रयोग करीत बसत. ते असे एकाच जागेवर तासनतास प्रयोग करीत बसत असल्याने मित्र मंडळी त्यांची नेहमी टर उडवत पण ते त्याकडे कायम दुर्लक्ष करीत. त्यांना निसर्गाचीही खूप आवड होती. पुढे त्यांची डॉ ग्रांट यांच्याशी ओळख झाली. डॉ ग्रांट हे स्वतः प्रसिद्ध जीव शास्त्रज्ञ होते. १८२५ मध्ये डार्विन यांनी केंब्रिज विद्यापीठाच्या क्राईस्ट महाविद्यालयात नाव नोंदवून पदवी मिळवली. तिथे त्यांना कीटक व निसर्गातील जीव जिवाणूंच्या निरीक्षणाचा नाद लागला. १८२६ मध्ये कॅप्टन किंगने दक्षिण अमेरिका संशोधनाची मोहीम आखली त्यात ते सहभागी झाले. त्या मोहिमेवर ते पाच वर्ष होते. तिथे त्यांनी निरनिराळे पक्षी, प्राणी, कीटक, जीवजंतू एकमेकांशी कसे वागतात. ते एकमेकांशी आणि निसर्गाशी कसे जुळवून घेतात याचे निरीक्षण व अभ्यास केला व तेथे उत्क्रांतीवाद, सहजीवन, बळी तो कान पिळी ही मूलभूत नैसर्गिक तत्वे ते शिकले. याच दरम्यान माणसाचा मूळ पुरुष, चार पायी माकडपासून झाला असला पाहिजे असा विचार त्यांच्या डोक्यात घुमू लागला. त्यांनी याचे खूप संशोधन केले. वेगवेगळे प्राणी कसे निर्माण झाले यासंदर्भातही त्यांनी खूप संशोधन केले. या संशोधनावर आधारित ओरिजन ऑफ स्पेसिस हा ग्रंथ त्यांनी लिहिला. या ग्रंथातच त्यांनी उत्क्रांतवादाचा सिद्धांत मांडला आहे. या ग्रंथाच्या १२५० प्रति एकाच दिवसात विकल्या गेल्या. या ग्रंथामुळे त्यांचे सर्वत्र त्यांचे नाव झाले. या ग्रंथात त्यांनी मांडलेला उत्क्रांतीवादाचा सिध्दांत बायबलच्या विरुद्ध जात होता म्हणून अनेकांनी या सिद्धांताला विरोध केला. हा सिद्धांत बायबलच्या विरुद्ध जातो म्हणून त्याचा निषेध करण्यासाठी १८६० मध्ये ऑक्सफर्डमध्ये विलबर फोर्स या बिशपने सभा बोलावली. डार्विन यांचा एकीकडे पुरोगामी विचारांचे लोक समर्थन करीत होते दुसरीकडे प्रतिगामी लोक विरोध करीत होते. पण या सर्व घडामोडींचा डार्विन यांच्यावर कोणताही परिणाम होत नव्हता त्यांचे संशोधन चालूच होते. बिशप डार्विनला कडाडून विरोध करीत असताना हक्सले डी हुकर हे शास्त्रज्ञ मात्र डार्विन यांची बाजू सडेतोड व सोदाहरण मांडत होते. त्यामुळे उत्क्रांतीवादाच्या सिद्धांताला कडाडून विरोध करणाऱ्या बिशपला अखेर माघार घेऊन डार्विनचा सिद्धांत मान्य करावाच लागला.

**श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे ९९२२५४६२९५**

## शेअर बाजारात घसरण

**मुंबई -** भारतीय शेअर बाजार घसरणीसह बंद झाल्याचं पाहायला मिळालं. शेअर बाजारात दिवसभर तेजी आणि घसरण सुरु होती. सेन्सेक्स ४०.२८ अंकांच्या घसरणीसह ८४२३३.६४ अंकांवर बंद झाला. निफ्टी १८.७० अंकांनी घसरुन २५९५३.८५ अकांवर बंद झाला. जागतिक बाजारातील संमिश्र संकेताच्या पार्श्वभूमीवर निफ्टीनं २६ हजारांचा टप्पा पार केला होता. मात्र, त्यानंतर निफ्टीत घसरण झाली. अमेरिकन जॉब मार्केटच्या रिपोर्टवर गुंतवणूकदारांचं लक्ष लागलं आहे. जागतिक बाजारातील संमिश्र संकेताच्या पार्श्वभूमीवर निफ्टीनं २६ हजारांचा टप्पा पार केला होता. मात्र, त्यानंतर निफ्टीत घसरण झाली. अमेरिकन जॉब मार्केटच्या रिपोर्टवर गुंतवणूकदारांचं लक्ष लागलं आहे. शेअर बाजारात सर्वाधिक तेजी ऑटो निर्देशांकात पाहायला मिळाली. निफ्टी फार्मा, पीएसयू बँक निर्देशांक १ टक्क्यांनी वधारला. दुसरीकडे आयटी निर्देशांक १.७ टक्क्यांनी घसरला.

# दिल्लीत 'घरवापसी अभियाना'चा संकल्प; २५ हून अधिक संघटना करणार राष्ट्रव्यापी पुनर्जागरण!

**नवी दिल्ली -** दिल्ली येथे नुकतेच पार पडलेल्या 'घरवापसी' संमेलनात देशभर घरवापसी अभियान राबवण्याचा दृढ संकल्प करण्यात आला. या संमेलनात देशभरातील २५ हून अधिक संघटनांचे प्रतिनिधी, अधिवक्ते, उद्योजक आणि घरवापसी चळवळीतील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या संमेलन आयोजन हिंदु जनजागृती समिती, 'सनातन घरवापसी फाऊंडेशन' आणि 'सनातन संवाद' यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते.

या संमेलनात घरवापसी अभियानाशी संबंधित विविध सामाजिक, कायदेशीर, आर्थिक आणि राजकीय समस्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच, या आव्हानांचा प्रभावीपणे सामना करण्यासाठी ठोस आणि व्यावहारिक उपायांवर विचारमंथन करण्यात आले.

या प्रसंगी देशभर कार्यरत असलेल्या घरवापसी संस्थांमध्ये समन्वय, संवाद आणि सहकार्य बळकट करण्याच्या उद्देशाने www.sanatansamvaad.com या विशेष 'डिजिटल प्लॅटफॉर्म'चे रीतसर अनावरण करण्यात आले.




भारताचा सांस्कृतिक वारसा, राष्ट्रीय सुरक्षा आणि सनातन परंपरांच्या रक्षणासाठी देशभर घरवापसी अभियान पुन्हा एकदा सशक्तपणे राबवले जाईल आणि समाजात जागृती वाढवण्यासाठी संघटित प्रयत्न केले जातील, असा संकल्प या संमेलनात करण्यात आला.

# सृष्टीचे पालनहार देवादी देव महादेव

भोले शंकर संपूर्ण सृष्टीचे व सर्वांचेच तारणहार दैवत आहे.असे सांगण्यात येते की संपूर्ण ब्रम्हांडामध्ये ३३ कोटी देवी-देवतांचा वास आहे.परंतु यात सर्वांचे पालनहार देवादी देव महादेव म्हणजेच शिव-पार्वती आहे. त्यामुळे शंकरजीला भोल्या शंकरा म्हटल्या जाते. समुद्र मंथनाच्या वेळेस जे विष निघाले ते शंकरजीनी प्राशन करून संपूर्ण सृष्टीला वाचविले व विष प्राशन केल्याने त्यांचा कंठ निळा झाला. शंकराचा वास सर्वसाधारण ठिकाणापासून तर स्मशान भूमीपर्यंत दिसून येतो.म्हणजेच आकार -पाताळ-पुर्व-पश्चिम-उत्तर-दक्षिण या संपूर्ण ठिकाणी आपल्याला कोणत्या ना कोणत्या रूपात भगवान शंकरजींचे दर्शन अवश्य होते.त्यामुळेच हिंदु मान्यतेनुसार शंकराच्या मुर्तीची किंवा पिंडाची पुजा केली जाते.भोले शंभर सर्वसामान्यांचेच देवता नसुन मानव-देव -दानव-किन्नर सर्वांचे आराध्य दैवत आहे.त्यामुळे आजही नागव्दार,महादेव,पचमडी इत्यादी अनेक ठिकाणी हजारोंच्या संख्येने भाविक दरवर्षी महादेवाच्या दर्शनाला जातात व भोल्या शंकराचे दर्शन घेऊन आपली मनोकामना पूर्ण करण्याचा प्रयत्न करतात. रावनासारखा महाग्यानी घोर राजनितीज्ञ हा सुध्दा शंकरजीचा कट्टर भक्त होता. रावणाची भक्ती पाहून शंकरजी प्रसन्न होऊन त्यांना बलशाली होण्याचे वर्दानसुध्दा दीले होते.त्यामुळे शंकरजीची पुजा करण्याचा अधिकार सर्वांनाच आहे. कारण शंकरजींची महीमा अपरंपार आहे.याच उद्देशाने शंकरजींनी आपले वास्तव्य सर्वसामान्यांपासून तर स्मशान भुमीपर्यंत अजरामर ठेवले आहे.आज स्थल,जल,वायु, आकाश-पाताळ, पुर्व-पश्चिम, उत्तर- दक्षिण या संपूर्ण ठिकाणी आपल्याला भोले शंकराचे दर्शन होते.आज आपण नद्यांचा उगम पहातो तो उगम शंकरजींच्या जटेतुन झाल्याचे अनेक कथा व पुराणात पहातो. कोणी मानो अथवा न मानो परंतु आपण या पृथ्वीतलावर हसतो,खेळतो,बागडतो यांचे मुख्य कारण म्हणजे या ब्रम्हांडातील देवी-देवतांचा वासच आहे. कोणतीही देवी-देवता असो त्यांचे स्मरण केल्याने मानसाच्या ह्रदयात व मनात एक उत्सहाचे वातावरण निर्माण होते नवीन ऊर्जा निर्माण होते. कोणताही देव दीसत नसला तरी मनात असला पाहिजे व संपूर्ण शक्ती सत्कर्मासाठी समर्पीत केली पाहिजे.आज संपूर्ण निसर्ग जो आपल्याला दिसतो त्यात लाखोंच्या संख्येने अनेक वृक्ष, फुले,फळे दिसून येते ही संपूर्ण ईश्वरी देनच आहे.परंतु संपूर्ण निसर्गाची रक्षा करने मानवजातीचे प्रथम कर्तव्य आहे.आपण सत्कर्माचा मार्ग अवलंबवीला तर देवादी देव महादेव आपणापर्यंत अवश्य येईल. महाशिवरात्री हा हिंदू धर्माचा पवित्र सन आहे.त्यामुळे महाशिवरात्री हा सन मोठ्या भक्तिभावाने सर्वत्र साजरा केल्या जातो. त्यामुळे आपल्याला सर्वत्र उत्सहाचे व मंगलमय वातावरण दिसून येते. महाशिवरात्रीला बेलपत्ती,गोंगलाचे फुले, आंब्याचे पाणीखायचे पान याला जास्त महत्व असते. म्हणजे पृथ्वीतलावरील प्रत्येक झाडाला, फळांना किंवा फुलांना आगळेवेगळे महत्व असते हे आपल्याला दिसुन येते.महादेवाचे गुणगान गाण्यांच्या स्वरूपात आपल्याला ऐकायला व पहायला मिळते. संपुर्ण भारतात १२ ज्योतिर्लिंग आहेत त्यापैकी ५ महाराष्ट्रात आहे. त्र्यंबकेश्वर, परळी बैजनाथ, भिमाशंकर, औंढा नागनाथ, घृष्णेश्वर ही बाब महाराष्ट्राच्या दृष्टीने गौरवशाली बाब आहे.या व्यतीरीक्त महाराष्ट्रासह भारतात भगवान शंकरजीचे अनेक मंदिरे आहेत.यावरून स्पष्ट होते की भगवान शंकरजीवर सर्वांचीच आस्था आहे.त्याच प्रमाणे नमो: शिवाय , शांती,हर हर महादेव इत्यादींचा जप केल्याने मन प्रसन्न रहाते,शांती मिळते, आरोग्याच्या दृष्टीकोणातु ओम नमो शिवाय हा जप महत्वपूर्ण मानल्या जातो यामुळे अनेक आजार दुर होण्यास मोठी मदत मिळते. आपण भोले शंकराचा जयघोष शिवकालीन इतिहासामध्ये सुध्दा ऐकली व पहाली आहे.शिवाजी महाराज व मावळे लढाईवर जातांना हर हर महादेवचा जयघोष करीत असे.यामुळे सैनिकांमध्ये नवचैतन्य निर्माण होवून एक नवीन उर्जा निर्माण होत होती.त्याचप्रमाणे आजही आपल्याला प्रत्येक शंकरजींच्या मंदिरात भाविकांचा हर हर महादेवचा जयघोष ऐकायला मिळतो.यामुळे सर्वांचेच मन प्रसन्न होते व नवीन ऊर्जा निर्माण होते.याचे मुख्य कारण म्हणजे देवादी देव महादेव हे सर्वांचेच पालनहार दैवत आहे.महाशिवरात्रीच्या सणाला लहान -मोठे, आबालवृद्धा सारखे संपूर्ण भावीक मोठ्या उत्साहाने उपवास ठेवतात यामागचा एकच उद्देश असतो की हे देवादी देव महादेव येणारे विघ्न टळुदे व सुख-शांती प्रदान कर. कारण आपण सुखी तर देश सुखी, देश सुखी तर संपूर्ण सृष्टी सुखी.महाशिवरात्रीच्या निमित्ताने मी हेच सांगु इच्छितो की स्थल,जल,वायु व निसर्ग याची जोपासना मानवजातीने वेळोवेळी केलीच पाहिजे. कारण बदलते हवामान व यामुळे वाढते प्रदुषण, जंगलातील हिंसक पशु शहरात प्रवेश करने, जंगलाला वनवे लागने,हिमकडा कोसळुन महाप्रलय येणे, सुनामी, ज्वालामुखीचा उद्रेक,अती उष्णता,अती थंडी,भुकंप याला रोखण्यासाठी संपूर्ण मानवजातीने निसर्गाची जोपासना केलीच पाहिजे.अन्यथा देवादी देव महादेव विक्राळ रूप सुध्दा धारण करू शकते.यालाही नाकारता येणार नाही. याचे अनेक उदाहरणे आपल्या समोर आहे.आपण निसर्गाची निर्मळ मनाने सेवा व जोपासना केली तर देवांदी देव महादेव अवश्य प्रसन्न होतील.यात दुमत नाही.देशात महाप्रलय, भुकंप, अती उष्णता,अती थंडी, सुनामी,वनवा लागणे, प्रदुषणात वाढ होणे व हवामानातील बदल या संपूर्ण गोष्टी निसर्गावर होत असलेल्या अन्याय व अत्याचारामुळे दिसून येते.देवादी देव महादेवाचा वास दऱ्या-खोऱ्यात, पहाडात, जंगलात, निसर्गानच्या सान्निध्यातील काणा -कोपऱ्यात व कणाकणात आपल्याला पहायला मिळतो. त्यामुळे महाशिवरात्रीच्या सनाच्या निमित्ताने निसर्गाची जोपासना करण्यासाठी सर्वांनीच संकल्प केला पाहिजे व निसर्ग संपदा विनाशापासुन वाचविली पाहिजे.महाशिवरात्रीच्या निमित्ताने प्रत्येकांनी एकतरी वृक्ष लावले पाहिजे.कारण प्रत्येक वृक्षाच्या पानात, फुलात, फळात आपल्याला भोले शंकराचे दर्शन अवश्य होईल. त्याचबरोबर वृक्ष लागवडीमुळे गुरांना चारा, मानवाला शुद्ध हवा व सर्वांनाच शुद्ध ऑक्सिजन मिळण्यास मोठी मदत होईल. महाशिवरात्रिच्या निमित्ताने जर वृक्षलागवड झाली तर देशात एकाच दिवशी लाखोंच्या संख्येने वृक्ष लागवड सहज होईल व निसर्ग प्रफुल्लित होण्यास मोठी मदत मिळेल.हर हर महादेव!



**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# हिंदुत्वनिष्ठ संघटनांच्या तीव्र विरोधामुळे अहिल्यानगरमधील 'व्हॅलेंटाईन डे' निमित्त आयोजित 'कॉफी रेव्ह पार्टी' रद्द !

**अहिल्यानगर । प्रतिनिधी -** येत्या १४ फेब्रुवारी २०२६ रोजी 'व्हॅलेंटाईन डे'च्या निमित्ताने अहिल्यानगर शहरातील शॉर्ट ब्रेक कॅफे, जावा जंक्शन, टायटन शोरूमजवळ आयोजित करण्यात आलेल्या तथाकथित 'सनडाऊनर कॉफी रेव्ह पार्टी' (Sundowner Coffee Rave Party) या कार्यक्रमास हिंदु जनजागृती समितीसह विविध हिंदुत्वनिष्ठ संघटनांनी तीव्र विरोध दर्शवला. या विरोधामुळे सदर कार्यक्रम रद्द करण्यात आला असून, पोलिसांनी याची माहिती समिती पदाधिकाऱ्यांना दिली आहे. तसेच संबंधित इंस्टाग्राम पेजवरील जाहिरात हटवण्यात आली आहे. हा हिंदूंच्या एकजुटीचा विजय आहे. अशा प्रकारे होत असलेले समाजविघातक कार्यक्रम राखणे, हे संस्कृतीरक्षणच आहे, अशी भूमिका हिंदु जनजागृती समितीचे जिल्हा समन्वयक श्री. रामेश्वर भुकन यांनी या वेळी व्यक्त केली.



हिंदु जनजागृती समितीसह विविध संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी अहिल्यानगरचे जिल्हाधिकारी श्री. पंकज आशिया व पोलीस अधीक्षक श्री. सोमनाथ घार्गे यांना निवेदन सादर करून या कार्यक्रमास परवानगी देऊ नये किंवा दिलेली परवानगी तात्काळ रद्द करावी, अशी मागणी केली होती. देशभरातील अशा रेव्ह पार्ट्यांमध्ये चऊ्र-, ङ्ङऊ गांजा, चरस, कोकेन यांसारख्या अंमली पदार्थांचा वापर होत असल्याचे अनेकदा पोलीस कारवायांमधून उघड झाले आहे. छऊ्रड कायद्याने अशा पदार्थांवर बंदी असूनही अशा कार्यक्रमांमुळे अंमली पदार्थांची विक्री चालू होण्याचा धोका निर्माण होतो.

अहिल्यानगर हे शिक्षणाचे केंद्र असून येथे मोठ्या संख्येने विद्यार्थी राहतात. अशा रेव्ह पार्ट्यांमुळे युवकांमध्ये व्यसनाधीनता वाढून त्यांच्या भवितव्यावर विपरीत परिणाम होऊ शकतो. मद्य आणि अमली पदार्थ यांच्या प्रभावाखाली महिलांवरील छेडछाड, अत्याचार, अश्लील चित्रीकरण, तसेच कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो, हे यापूर्वी अनेक घटनांमधून सिद्ध झाले आहे. तसेच यात जाणीवपूर्वक मुलींना सवलतीत किंवा कमी किमतीत प्रवेश देऊन आमंत्रित केल्यामुळे 'लव्ह जिहाद'च्या घटनांमध्ये वाढ होण्याची भीतीही व्यक्त करण्यात आली होती. या वेळी हिंदु जनजागृती समितीचे जिल्हा समन्वयक श्री. रामेश्वर भुकन, जिल्हा हिंदु संघटक श्री. बापू ठाणगे, भाजप महिला मोर्चा राज्य सचिव सौ. गीता गिल्डा, भाजप कार्यालय मंत्री श्री. मुकुल गंधे, बजरंग दलाचे श्री. नाना मोरे, हिंदु राष्ट्र समन्वय समितीचे श्री. अजिंक्य गायकवाड, महाराष्ट्र मंदिर महासंघाचे श्री. भरत शिंदे, श्री. सुनील शिंदे, रणरागिणी शाखेच्या सौ. सुरेखा विद्ये, सामाजिक कार्यकर्ते श्री. दिनेश जोशी, हिंदु टाईम्सच्या संपादिका सौ. स्नेहा जोशी, श्री. रवी गाली आदी उपस्थित होते. निवेदनाची दखल घेऊन जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षकांनी योग्य कारवाई करण्याचे आश्वासन दिले होते. सर्व हिंदुत्ववादी संघटनांच्या सततच्या प्रयत्नांमुळे सदर रेव्ह पार्टी रद्द झाली, याबद्दल सर्व संघटनांचे आभार, तसेच ईश्वरचरणी कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

पान १ वरुन

## सुकन्या गवते ...

आजपावेतो ३६ आरोपींना अटक करण्यात आली आहे. यामध्ये २१ तलाठी, ३ सहाय्यक महसुल अधिकारी, १ कृषी सहाय्यक, ३ कोतवाल आणि ८ एजंटांचा समावेश आहे. इतर आरोपी आणि एजंटांचा शोध सुरू आहे.

अजयकुमार बंन्सल, पोलीस अधीक्षक, जालना आयुष नोपाणी, अपर पोलीस अधीक्षक, जालना, सिध्दार्थ माने प्रभारी पोलीस उपअधीक्षक, आर्थिक गुन्हे शाखा , मिथुन घुगे, स. पोलीस निरीक्षक, आर्थिक गुन्हे शाखा जालना, पोउपनि शैलेश म्हस्के, पोलीस अंमलदार गोकुळसींग कायटे, समाधान तेलंग्रे, किरण चव्हाण इत्यादींनी हि कारवाई केली. तपासकार्याच्या पुढील तपशिलांसाठी इतर आरोपींवर कारवाई सुरू आहे.

## ग्रामपंचायतींवर ...

निर्माण होण्याची शक्यता आहे, जे लोकशाही व्यवस्थेला बाधक ठरेल असेही आमदार बबनराव लोणीकर यांनी पत्रात म्हटले आहे.

तसेच राज्यात विस्तार अधिकाऱ्यांची संख्या मर्यादित असून हजारो ग्रामपंचायती रिक्त होत आहेत. ही परिस्थिती प्रशासनाच्या क्षमतेपलीकडील असून त्यामुळे कामकाजावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे संविधानातील ७३ वी घटनादुरुस्ती, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५९ आणि उच्च न्यायालयाच्या आदेशांचा अर्थ लक्षात घेता, विद्यमान सरपंच व ग्रामपंचायत सदस्य यांनाच प्रशासक म्हणून तात्पुरता पदभार सुरू ठेवू देणे हे कायदेशीर, लोकशाहीदृष्ट्या योग्य आणि प्रशासनाच्या अधिक हिताचे ठरेल. तरी वरील सर्व बाबींचा सहानुभूतीपूर्वक व कायदेशीर दृष्टिकोनातून विचार करून ग्रामपंचायतींवर प्रशासक म्हणून विद्यमान सरपंच व ग्रामपंचायत सदस्य यांचाच पदभार कायम ठेवण्याबाबत शासनाने अनुकूल निर्णय घ्यावा, आपल्या सकारात्मक निर्णयामुळे ग्रामीण स्वराज्य व्यवस्था बळकट होईल, असा विश्वास देखील आमदार बबनराव लोणीकर यांनी व्यक्त केला आहे.

## शासकीय कार्यालयात ...

जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिला आहे. या आदेशाची अंमलबजावणी आजपासूनच लागू करण्यात आली आहे. प्रशासकीय शिस्त आणि रस्ते सुरक्षेसाठी मोटर वाहन अधिनियम १९८८ मधील कलम १२९ नुसार, दुचाकी चालक आणि पाठीमागे बसणाऱ्या व्यक्तीने हेल्मेट वापरणे कायदेशीररीत्या अनिवार्य आहे. प्रशासकीय स्तरावर याचा आदर्श निर्माण व्हावा, या उद्देशाने जिल्हाधिकाऱ्यांनी हे आदेश निर्गमित केले आहेत.

## जालना शहराचा ...

नागरिकांना एक सुसज्ज जागा उपलब्ध होईल. वैजीनाथ नगर येथील संरक्षण भिंत बांधकामामुळे सुरक्षिततेचा प्रश्न मार्गी लागेल. समर्थ सोसायटी व ओजस कॉलनीतील रस्ते व नाली कामांमुळे स्वच्छता आणि आरोग्यदायी वातावरण निर्माण होईल.

विकासकामांमध्ये पारदर्शकता व गुणवत्ता याबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नाही. कामे वेळेत आणि उत्तम दर्जाची पूर्ण व्हावीत यासाठी संबंधित यंत्रणेला स्पष्ट सूचना दिल्या आहेत. भविष्यातही नागरिकांच्या सहकार्याने आणि विश्वासाने प्रभाग क्रमांक १६ सह संपूर्ण जालना शहरात अधिकाधिक विकासकामे राबविण्याचा आमचा संकल्प आहे.

या कार्यक्रमास शिवसेना संपर्कप्रमुख पंडितदादा भुतेकर, नगरसेविका दर्शना झोल खोतकर, दलित आघाडी प्रमुख भास्कर मगरे, नगरसेवक निखिल पगारे, किशोर पांगरकर, अमोल ठाकूर, संदीप साबळे, पिटर खंदारे यांच्यासह परिसरातील ज्येष्ठ नागरिक, महिला भगिनी व तरुण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या शेवटी स्थानिक नागरिकांनी आमदार अर्जुनराव खोतकर यांचे आभार मानत विकासकामांबद्दल समाधान व्यक्त केले. या विकासकामांमुळे समर्थ नगर व परिसर अधिक स्वच्छ, सुरक्षित आणि सुशोभित होणार असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली.

# पासपोर्ट नूतनीकरणासाठी फौजदारी न्यायालयाची परवानगी अनिवार्य नाही; राजस्थान उच्च न्यायालय

**जालना । प्रतिनिधी - ॲड.** महेश एस. धनावत, कार्याध्यक्ष, नोटरी असोसिएशन: हा निकाल म्हणजे नागरिकांच्या वैयक्तिक स्वातंत्र्याच्या हक्काचा विजय आहे. पासपोर्टसारखा महत्त्वाचा दस्तऐवज केवळ खटला प्रलंबित आहे म्हणून रोखून धरणे, हे कायद्याच्या मूळ उद्देशालाच हरताळ फासण्यासारखे होते. न्यायालयाच्या या निर्णयामुळे अशा अनेक लोकांना दिलासा मिळेल, ज्यांना केवळ तांत्रिक कारणांमुळे पासपोर्ट नूतनीकरणासाठी त्रास सहन करावा लागत होता.

केवळ फौजदारी खटला प्रलंबित आहे या कारणास्तव पासपोर्ट नूतनीकरणासाठी अर्जदाराला फौजदारी न्यायालयाची परवानगी घेण्यास भाग पाडले जाऊ शकत नाही, असा महत्त्वपूर्ण निकाल राजस्थान उच्च न्यायालयाने दिला आहे. विशेषतः जेव्हा फौजदारी कार्यवाहीला स्थगिती देण्यात आली असेल आणि संबंधित न्यायालयाने अर्जदाराचा पासपोर्ट ताब्यात ठेवण्याबाबत कोणताही मनाई हुकूम दिला नसेल, तेव्हा पासपोर्ट प्राधिकरणाचा असा आग्रह अयोग्य असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले.

न्यायमूर्ती फरजांद अली यांच्या खंडपीठाने पासपोर्ट कायदा, १९६७ च्या कलम ६(२)(एफ) चा सखोल अभ्यास करून हा निर्णय दिला. या कलमाचा अर्थ फौजदारी खटला प्रलंबित असल्यामुळे पासपोर्ट जारी करण्यास किंवा त्याचे नूतनीकरण करण्यास आपोआप किंवा पूर्णपणे प्रतिबंध घातला जातो, असा होत नाही. हा प्रतिबंध विशिष्ट उद्देशाने आणि आरोपी व्यक्ती फौजदारी न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रात उपलब्ध राहील, हे सुनिश्चित करण्यापुरताच मर्यादित आहे, असे न्यायालयाने नमूद केले.

या प्रकरणात, एका बनावट मृत्युपत्रावर साक्षीदार म्हणून सही केल्याच्या आरोपावरून याचिकाकर्त्याला आरोपी बनवण्यात आले होते. या फौजदारी खटल्याच्या कार्यवाहीवर स्थगितीचा आदेश लागू होता. जेव्हा याचिकाकर्त्याने आपल्या पासपोर्टच्या नूतनीकरणासाठी अर्ज केला, तेव्हा त्याला फौजदारी खटला निकाली निघाला आहे की नाही, हे स्पष्ट करण्यास सांगण्यात आले. कार्यवाही प्रलंबित असल्याने त्याचे नूतनीकरण थांबवण्यात आले होते, ज्यामुळे त्याने उच्च न्यायालयात धाव घेतली.

याचिकाकर्त्याच्या वकिलांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी केवळ पासपोर्ट नूतनीकरणासाठी अर्ज केला होता, परदेशात प्रवास करण्याची परवानगी मागितली नव्हती. तसेच, सत्र न्यायालयाने पासपोर्ट ठेवण्यास मनाई करणारा कोणताही आदेश दिला नसल्यामुळे, केवळ खटला प्रलंबित असणे हे नूतनीकरणासाठी न्यायालयाच्या परवानगीची अट लागू करण्याचे कारण असू शकत नाही. याउलट, सरकारी पक्षाने असा युक्तिवाद केला की, याचिकाकर्त्याने अर्ज करण्यापूर्वी न्यायालयाची परवानगी घेतली नसल्याने नूतनीकरणाची प्रक्रिया थांबवण्यात आली.

न्यायालयाने दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर स्पष्ट केले की, पासपोर्टचे नूतनीकरण आणि देश सोडून जाण्याची परवानगी या दोन पूर्णपणे भिन्न गोष्टी आहेत. पासपोर्टचे नूतनीकरण म्हणजे केवळ एक वैध नागरी दस्तऐवज जवळ बाळगण्याचा अधिकार मिळतो. यामुळे अर्जदाराला आपोआप प्रवास करण्याचा हक्क मिळत नाही किंवा फौजदारी न्यायालयाचे अधिकार कोणत्याही प्रकारे कमी होत नाहीत.

भारतीय संविधानाच्या कलम २१ नुसार, प्रत्येक नागरिकाला संचार आणि प्रवासाचे स्वातंत्र्य हा अविभाज्य वैयक्तिक स्वातंत्र्याचा भाग आहे. या स्वातंत्र्यावर कायद्यानुसार वाजवी निर्बंध घालता येतात, परंतु असे निर्बंध कायद्यावर आधारित आणि समानुपातिक असावेत. गुन्हा सिद्ध होण्यापूर्वी अशा निर्बंधांना दंडात्मक किंवा अनिश्चित काळासाठी लागू केले जाऊ शकत नाही, असेही न्यायालयाने अधोरेखित केले.

कलम ६(२)(एफ) चा मर्यादित उद्देश आरोपीला न्यायालयासमोर हजर ठेवणे हा आहे, त्याचा संबंध नसलेल्या इतर परिणामांना लादणे हा नाही, असे न्यायालयाने म्हटले. त्यामुळे, जोपर्यंत न्यायालयाने स्पष्ट मनाई आदेश दिला नाही, तोपर्यंत केवळ नूतनीकरणासाठी न्यायालयाकडून 'ना हरकत प्रमाणपत्र' घेण्याचा आग्रह धरणे हे कायद्याच्या किंवा संबंधित अधिसूचनेच्या हेतूशी विसंगत आहे, असे न्यायालयाने स्पष्ट केले आणि याचिका मंजूर केली.

या निकालातून सर्वसामान्य नागरिकांनी हे शिकले पाहिजे की, केवळ फौजदारी खटला प्रलंबित असणे, हे तुमच्या नागरी हक्कांवर गदा आणण्याचे कारण ठरू शकत नाही. कायद्यातील तरतुदींचा अर्थ मर्यादित आणि तर्कसंगत पद्धतीने लावला जातो. जोपर्यंत न्यायालयाने स्पष्टपणे तुमच्या प्रवासावर किंवा पासपोर्ट बाळगण्यावर निर्बंध घातले नाहीत, तोपर्यंत संबंधित अधिकारी केवळ खटला प्रलंबित असल्याच्या कारणावरून पासपोर्ट नूतनीकरणासारखे अधिकार नाकारू शकत नाहीत. हा निकाल नागरिकांना त्यांच्या हक्कांबाबत जागरूक राहण्यासाठी आणि प्रशासकीय मनमानीविरुद्ध आवाज उठवण्यासाठी एक महत्त्वाचे कायदेशीर शस्त्र देतो.

# जालना येथे तांत्रिक उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** मिटकॉन प्रशिक्षण केंद्र, जालना व उद्योग विकास विभाग आणि शासकीय औद्योगिक विकास महामंडळे यांच्या वतीने जालना येथे दि.१६ फेब्रुवारी २०२६ पासुन एक महीना कालावधीत तांत्रिक उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

सदरील प्रशिक्षण कार्यक्रमात युवक व युवतींसाठी स्वत:चा उद्योग/व्यवसाय उभारणीसाठी व कर्ज प्रकरण करण्यासाठी हा प्रशिक्षण वर्ग अंत्यत महत्त्वाचा राहणार आहे.या प्रशिक्षण कार्यक्रमात सौर ऊर्जा (सोलर एनर्जी) , विद्युत वाहणे (इलेक्ट्रिकल व्हेअकल) व सायबर सुरक्षा व इतर अनेक उद्योगा बाबतीत थेरी व प्रात्येक्षिकासह मार्गदर्शन राहणार आहे. या प्रशिक्षणात मशिनरी हाताळणे, सोलर एनर्जी प्लेट तयार करणे, कच्चामाल, साहीत्य ,कॅप्रीसिटी, जोडणी व विक्रीव्यवस्था, बिघाड दुरुस्ती व उपलब्ध प्लॅन्ट या सोबत उद्योग संधी मार्गदर्शन, उद्योग प्रेरणा, संघटन कौशल्य, उद्योजकीय गुणसंपदा, व्यक्तीमत्व विकास, प्रभावी संभाषण कौशल्य, उद्योग व्यवस्थापन, जागेची निवड, बाजारपेठ पाहनीतंत्र, शासकीय व निमशासकीय योजना, जिल्हा उद्योग केंद्राच्या विविध योजना,खादीग्राम उद्योग मंडळाच्या योजना, महामंडळाच्या विविध योजना, कृषी संलग्न योजना, प्रकल्प अहवाल तयार करणे, कर्ज प्रस्ताव तयार करणे, बॅंकेची कार्यप्रणाली , विक्री व्यवस्था,भांडवल उभारणी ,मनुष्यबळ , विमा संरक्षण, शासकीय परवाने, प्रशिक्षण प्रमाणपत्र इत्यादी बाबतीत तज्ञ प्रशिक्षक, वरिष्ठ अधिकारी व यशस्वी उद्योजकांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

अधिक माहिती व प्रवेश अर्जासाठी के डी दांडगे ,जिल्हा प्रकल्प अधिकारी ,मिटकॉन द्वारा पत्रकार भवन, एस. पी. ऑफिस समोर , शासकीय ग्रंथालयाच्या बाजूला ,जालना.मो.९४२३७३०९३२ येथे दि.१६ फेब्रुवारी २०२६ पर्यंत संपर्क साधावा असे आवाहन के डी दांडगे मिटकॉन जालना यांनी केले आहे.

# स्व.पंडित दीनदयाळ उपाध्याय यांची भाजपा जिल्हा कार्यालयात पुण्यतिथी साजरी




**जालना । प्रतिनिधी -** स्व.पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या पुण्यतिथी ( बलीदान दिन ) निमित्त आज दि.११ फेब्रुवारी २०२६ बुधवार रोजी, भारतीय जनता पार्टी जिल्हा कार्यालय संभाजीनगर, जालना येथे त्यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करुन भावपुर्ण अभिवादन करण्यात आले. यावेळी बोलतांना जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे म्हणाले की, प्रखर राष्ट्रवादी,कुशल संघटक,आंत्योदय आणि एकात्म मानववादाचे महान प्रनेते श्रध्देय स्व.पंडित दीनदयाळ उपाध्याय त्यांचे विचार तत्वज्ञान आणि राष्ट्रसेवेचा आर्दश मार्गदर्शक ठरवून समाजातील शेवटच्या घटकापर्यंत विकास पोहचविण्यास सदैव प्रेरणा देत राहील असे त्यांनी सांगितले.

यावेळी जालना महानगर पालिका महापौर श्रीमती वंदना मगरे, उप महापौर श्री.राजेश राऊत, माजी जिल्हाध्यक्ष श्री.रामेश्वर भांदरगे, श्री.विरेंद्र धोका, नगरसेवक अशोक पांगारकर, गट नेते महेश निकम,प्रतोद रमेश गोरक्षक,सिध्दीविनायक मुळे, विजय कामड,सुनिल खरे,धनराज काबलिये, वसंतराव शिंदे,सुनिल पवार, अमोल कांरजेकर,देविदास देशमुख,राजेश जोशी, गोवर्धन कोल्हे, सुरेखा बोटूळे,शितल तनपुरे, रोषण चौधरी,बाबासाहेब उगले,सुमित सुरडकर,संजय भगत,उमेश पेंढारकर,निलेश गवळी, समर्पण विजयसेनानी, पियुष मुंगशे, सुभाष सले,गोविंद ढेंबरे,सुंदर्शन काळे,शिवाजी वेताळ,नागेश अंभोरे, निलेश गोर्डे,नानासाहेब देव्हडे,विकास कदम,आनंद झारकंडे,सोमेश काबलिये, सेवकराम नारीयलवाले, रामकिसन मांन्टे, श्याम उगले,कैलास पवार,राधाकिसन काटे,दौलत भुतेकर, राजाराम जाधव,डिंगाबर सातपुते,राजु उगले,विष्णु राठोड, रंणजीत मगरे,विठ्ठल नरवडे,गजानन खडागळे यांच्यासह आदींची उपस्थित होती.

# मराठी मुद्दा-राज ठाकरे चा मोहन भागवतांना घरचा आहेर

तामिळनाडू,कर्नाटक, गुजरात राज्यातील सरकारचा प्रशासनाचा व विशेष जनतेचा प्रचंड अभिमान वाटतो, कारण त्यांना त्यांची प्रांतिक भाषा व अस्मितेबद्दल प्रचंड आदर वाटतो म्हणून ते परभाषिकांना चोपून राज्याबाहेर घालवतात. तोच आपल्या महाराष्ट्रातील कुचकामी,लबाड,ढोंगी,सत्तालोलुप,केंद्राचे तळवे चाटे,संधिसाधु,बेगडी मराठी प्रेम दाखवणारे,कणाहीन सरकार,प्रशासन व ज्यांची मराठी संस्कृती व अस्मिता मातीमोल करणाऱ्या काही मराठी माणसांची घृणा वाटते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मोहनजी भागवत हे सरड्यासारखे रंग बदलणारे आहेत हे त्यांच्या वेळोवेळी घेतलेल्या भूमिकेवरून वाटते त्यांचे वय झाले आहे त्यांनी थकलेले बौद्धिक पाजळण्यापेक्षा निवृत्त होणे हि काळाची गरज आहे. आरएसएस मध्ये सुशिक्षितांचा भरणा प्रचंड आहे, पण ते बौद्धिकदृष्ट्या सुसंकृत आहेत काय हा प्रश्न निर्माण होतो केंद्राने मराठी भाषेचा दर्जा देऊन सुद्धा महाराष्ट्रात त्याचीच गळचेपी होते त्याविरुद्ध्द आवाज का उठवला जात नाही. आरएसएसच्या बुद्धीजीवीनि मराठी अस्मिता जपण्यासाठी प्रसंगी आरएसएसचा त्याग करून मराठीचा कैवार घेतलेल्या शिवसेना व राज ठाकरे ह्यांच्या पाठीशी सक्रिय होणे हि मराठी व महाराष्ट्राची आग्रही गरज आहे ते शिवधनुष्य त्याने उचलले पाहिजे. परभाषिकांची गुर्मी वाढत चालली आहे मराठी भाषिकांवर अन्याय होतो हे भागवताना दिसत नाही काय ? परभाषिकांना त्यांच्या राज्यात का पाठवले जात नाही तेथे आरएसएस च्या बुद्धीला लकवा कसा मारला जातो. शिवसेना आणि राज ठाकरे यांनी प्रत्येक वेळी मराठी भाषा आणि अस्मिता जपण्याचा व तो तडीस नेण्याचा नेहमी प्रयत्न केला आहे, म्हणून मराठी माणूस आज ताठ मानेने आपलं स्थान राखून आहे तसा प्रयत्न आरएसएस,भाजप व अन्य पक्षाकडून होताना का दिसत नाही ? भाषेवरून दिशाभूल करणे व टोमणे मारणे हे भागवत ह्यांना शोभत नाही म्हणून राज ठाकरे यांनी आपली कडवट रोखठोक भूमिका मांडली. त्याचे महाराष्ट्रातील तमाम जनतेने आभार मानले पाहिजेत. भागवत ह्यांचा जावई हा मुस्लिम आहे असे समजते म्हणून कदाचित आरएसएस च्या रटाळ प्रवचनाला ज्यांची इच्छा नाही अशांनाही नाईजाने केंद्राचा दबावामुळे यावे लागते हा राज ठाकरे यांनी केलेला आरोप योग्यच आहे. महाराष्ट्रातील तमाम मराठी भाषिकांनी पक्षभेद बाजूला ठेवून राज ठाकरे ह्यांनी घेतलेल्या कडवट भूमिकेचे समर्थन करून मराठी अस्मितेची मान ताठ केली पाहिजे. गप्प बसलात तर आपल्याच राज्यात आपण परप्रांतीय होऊ हेही लक्षात ठेवा म्हणजे ते म्हणतील मुंबई तुमची आणि भांडी घासा आमची.

**यशवंत चव्हाण सीबीडी बेलापूर मो.९९२०७७६२७७**




# ग्रामीण आवास योजनेच्या उद्दिष्टपूर्तीसाठी कामांना गती द्यावी -विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी -** केंद्र व राज्य शासन पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या घरकुल योजनांचा विभागीय आयुक्त श्री. जितेंद्र पापळकर यांनी आज सविस्तर आढावा घेतला. फेब्रुवारी अखेरपर्यंत शासनाने निश्चित केलेली उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी सर्व जिल्ह्यांतील संबंधित यंत्रणांनी कामांना गती द्यावी, असे स्पष्ट निर्देश त्यांनी दिले.

विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित बैठकीत ग्रामीण आवास योजना व इतर महसूलच्या विविध योजनांचा आढावा घेण्यात आला. यावेळी अपर आयुक्त रिता मैत्रेवार, सुषमा देसाई, सह आयुक्त डॉ. अनंत गव्हाणे तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मुख्य अभियंता मनीषा पलांडे उपस्थित होत्या. दुरदृश्य प्रणालीद्वारे विभागातील जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी व संबंधित यंत्रणांचे प्रमुख सहभागी झाले होते.

विभागातील अनेक ठिकाणी जागेअभावी घरकुलांची कामे रखडत असल्याचे निदर्शनास आल्याने, शासकीय, ग्रामपंचायतीच्या व अन्य उपलब्ध जागांचा योग्य वापर करून तातडीने अडचणी दूर करा तसेच मंजूर घरकुलांची कामे वेळेत सुरू करून पूर्ण करावीत तसेच त्याबाबतचे प्रगती अहवाल नियमित व अद्ययावत स्वरूपात सादर करावेत, असे निर्देश विभागीय आयुक्त श्री. पापळकर यांनी दिले.

बैठकीदरम्यान विभागीय आयुक्तांनी सर्व जिल्हाधिकारी व संबंधित यंत्रणांशी थेट संवाद साधत कामातील अडचणी, निधीविषयक बाबी, तांत्रिक अडथळे व प्रशासकीय समस्या जाणून घेतल्या. या अडचणी तत्काळ सोडविण्यासाठी समन्वयाने कार्यवाही करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.



जिल्हानिहाय सादर करण्यात आलेल्या अहवालांच्या आधारे मंजूर, पूर्ण व प्रलंबित घरकुल योजनांचा आढावा घेण्यात आला. ज्या ठिकाणी कामाची गती मंद आहे, त्या ठिकाणी विशेष लक्ष देऊन तातडीने सुधारणा करण्याचे निर्देश आयुक्त पापळकर यांनी दिले.

घरकुल योजनेच्या अंमलबजावणीत गुणवत्ता, पारदर्शकता व वेळेचे काटेकोर पालन आवश्यक असल्याचे ते म्हणाले. ग्रामीण भागातील गरीब, वंचित व गरजू कुटुंबांचे हक्काचे घराचे स्वप्न पूर्ण करणे हे शासनाचे प्रमुख उद्दिष्ट असून, त्यासाठी प्रशासनाने अधिक संवेदनशीलतेने, जबाबदारीने व नियोजनबद्ध पद्धतीने काम करावे, असे त्यांनी सांगितले.

सन २०२५-२६ च्या खरीप हंगामातील अतिवृष्टी व पुरामुळे नुकसान झालेल्या सिंचन विहिरींची दुरुस्ती तसेच खरडून गेलेल्या जमिनींच्या पुनर्बांधणीसाठी विशेष मोहिम राबविण्याचे निर्देशही देण्यात आले. तसेच बाधितांना फेब्रुवारीअखेर निधी वितरित करा असे निर्देश जिल्हाधिकारी यांना विभागीय आयुक्त श्री. पापळकर यांनी दिले. यावेळी सबंधित यंत्रणांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव योजनेस मंत्रीमंडळाची मान्यता

## लोकसहभागातून आरोग्यदायी महाराष्ट्र घडविण्याचा निर्धार

**मुंबई -** राज्यातील ग्रामीण आरोग्य सेवा अधिक सक्षम, रोगमुक्त व स्वयंपूर्ण करण्याच्या दिशेने आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या महत्वाकांक्षी माझं गाव, आरोग्य संपन्न गाव या अभियानास राज्य सरकारने मंजूरी दिली आहे. लोकसहभागावर आधारित माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव ही राज्यव्यापी आरोग्य चळवळ राबविण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. एक एप्रिलपासून ३१ मार्चपर्यंत राज्यभर हे अभियान राबविण्यात येणार आहे.

गाव पातळीवर नागरिकांचे आरोग्यमान उंचावण्यासाठी, प्रतिबंधात्मक व प्रोत्सनात्मक आरोग्य सेवाना चालना देण्यासाठी, आरोग्यविषयक सामाजिक वर्तणुकीत बदल, व आरोग्यदायी जीवनशैली रुजवण्यासाठी हे अभियान प्रभावी ठरणार असून, सार्वजनिक स्वच्छता, पाणीपुरवठा, सामाजिक प्रबोधन यासह ग्रामीण भागातील विविध घटकांच्या समन्वयाने आरोग्यदायी गाव बनवणे हा या अभियानाचा मुख्य उद्दीष्ट आहे.

या अभियाना अंतर्गत उपचारांपेक्षा आजार होऊ नयेत, यावर विशेष भर देण्यात येणार आहे. संसर्गजन्य व असंसर्गजन्य आजारांचे प्रमाण कमी करणे, माता-बाल आरोग्य सुधारणे, पोषण, स्वच्छता, सुरक्षित पाणी, सांडपाणी व्यवस्थापन, जीवनशैलीजन्य आजारांचे नियंत्रण आणि मानसिक आरोग्य यांचा समावेश या मोहिमेत करण्यात आला आहे. नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याचा सरकारचा मानस आहे.

माझं गाव आरोग्यसंपन्न गाव योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्यस्तरीय, विभागस्तरीय, जिल्हा, तालुका व ग्रामपंचायत स्तरावर समित्या स्थापना केल्या जाणार आहेत. आरोग्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय समिती समिती असून, विविध विभागांचे अपर मुख्य सचिव, आयुक्त व संचालक या समितीचे सदस्य असतील. राज्यस्तरीय कृती समितीही स्थापन करण्यात येणार असुन, सार्वजनिक आरोग्य विभागाचे प्रधान सचिव (अपर मुख्य सचिव) समितीचे अध्यक्ष असतील. आरोग्य विभागाच्या निर्देशानुसार गावांचे मूल्यमापन करण्यात येणार आहे. एकूण गुणांपैकी ७० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळविणाऱ्या गावांना आरोग्यसंपन्न गाव म्हणून घोषित करण्यात येईल. अशा गावांना स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र व रोख पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. अभियानासाठी सुमारे ८०.७५ कोटी रुपये निधी मंजूर करण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली. माझं गाव आरोग्यसंपन्न गाव ही योजना म्हणजे केवळ आरोग्य विभागाची नव्हे, तर समाजाच्या सर्व घटकांच्या सहभागातून उभी राहणारी लोकचळवळ ठरणार आहे. या निर्णयामुळे ग्रामीण आरोग्य व्यवस्थेला नवी दिशा मिळणार असून, आरोग्यदायी महाराष्ट्र घडविण्याच्या संकल्पनेला बळकटी मिळणार आहे.

# नागरिकांना विहित वेळेत सेवा द्या

## राज्य लोकसेवा हक्क आयुक्त किरण जाधव यांचे सूचना

**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र राज्य लोकसेवा हक्क आयोग, छत्रपती संभाजीनगर विभागाचे आयुक्त मा. श्री. किरण जाधव यांनी आज दिनांक १० फेब्रुवारी २०२६ जालना शहर महानगरपालिकेला भेट देऊन सेवा हक्क कायद्याच्या अंमलबजावणीचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी त्यांनी महापालिकेतील सेवा ऑनलाईन करण्यावर आणि पारदर्शकतेवर विशेष भर दिला.

आयुक्त किरण जाधव यांचा सत्कार व मार्गदर्शन महानगरपालिकेत आगमन झाल्यानंतर उपमहापौर श्री. राजेश राऊत यांच्या हस्ते आयुक्त किरण जाधव यांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर आयोजित बैठकीत त्यांनी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले. नागरिकांना मिळणाऱ्या सेवा या 'आपले सरकार' या संकेतस्थळावर उपलब्ध असून, त्या विहित कालमर्यादेतच निकाली काढणे बंधनकारक आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

बैठकीतील महत्त्वाचे निर्देश: ✻ फेटाळलेल्या अर्जांचे स्पष्टीकरण: जर एखादा अर्ज फेटाळला जात असेल, तर त्याचे ठोस कारण अर्जावर नमूद करून तसे पत्र संबंधित नागरिकाला द्यावे, जेणेकरून त्याला अपील दाखल करता येईल.

ए.आय. (ख) तंत्रज्ञानाचा वापर: भोपाळच्या धर्तीवर ऋखड प्लॅन आणि ख ब्लॉकचेन तंत्रज्ञानाचा वापर करून मालमत्ताधारकांना तात्काळ सेवा देण्याच्या दृष्टीने जालना महापालिकेने पावले उचलावीत.

ऑनलाईन सेवांवर भर: सेवा हक्क कायद्यांतर्गत येणाऱ्या सर्व सेवा लवकरात लवकर १००% ऑनलाईन करण्यात याव्यात.

अधिकारी गुणांकन व अहवाल: पदनिर्देशित अधिकाऱ्यांनी दिलेल्या सेवांच्या आधारावर त्यांना



गुण दिले जातील. तसेच, दर महिन्याचा अर्जांचा मासिक घोषवारा राज्य लोकसेवा आयोगाकडे सादर करणे अनिवार्य आहे.

उत्कृष्ट कर्मचाऱ्यांचा सत्कार: ज्या विभागात नागरिकांना उत्कृष्ट व जलद सेवा दिली जाईल, अशा अधिकारी व कर्मचाऱ्यांचा गौरव करून त्यांना प्रोत्साहनात्मक बक्षीस देण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

तदनंतर जालना शहर महानगरपालिकेचे उपमहापौर राजेश राऊत यांनी महाराष्ट्र राज्य लोकसेवा हक्क आयोगांतर्गत असलेल्या सर्व सेवा या महानगरपालिकेच्या वतीने लवकरात लवकर ऑनलाइन पद्धतीने नागरिकांना उपलब्ध करून देण्यात येईल तसेच आयुक्त यांनी दिलेल्या सूचनांची अंमलबजावणी करण्यात येईल असे आश्वासन आयुक्त राज्य लोकसेवा हक्क आयोग विभाग छत्रपती संभाजी नगर यांना दिले.

या महत्त्वपूर्ण बैठकीस जालना शहराच्या प्रथम महापौर श्रीमती वंदना अरुण मगरे, उपमहापौर श्री. राजेश राऊत, अतिरिक्त आयुक्त श्री. अर्जुन गिराम, उपायुक्त श्रीमती नंदा गायकवाड यांच्यासह सर्व सहाय्यक आयुक्त, पदनिर्देशित अधिकारी आणि विविध विभागांचे प्रमुख उपस्थित होते.

# जनगणनेच्या कामात दिरंगाई चालणार नाही - निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल

**जालना । प्रतिनिधी -** जनगणना हे राष्ट्रीय व महत्त्वाचे काम असून या कामी कोणीही हलगर्जीपणा अथवा दिरंगाई करु नये तसे केल्यास जनगणना अधिनियम १९४८ नुसार कारवाई करण्यात येईल असे निवासी उपजिल्हाधिकारी तथा चार्ज अधिकारी,जनगणना शशिकांत हदगल यांनी आगामी जनगणना २०२७ च्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कार्यालय, जालना येथे जिल्ह्यातील सर्व नायब तहसीलदार, नगर परिषद व नगर पंचायतचे मुख्याधिकारी तसेच तहसील कार्यालयातील जनगणना विभागातील कर्मचाऱ्यांच्या बैठकीत दिले.

या बैठकीस जनगणना विभागातील नायब तहसीलदार सतीश तायडे, सहायक महसूल अधिकारी श्रीमती संपदा कुलकर्णी, कनिष्ठ प्रशासन अधिकारी रामेश्वर राख, गटनिदेशक एस. जी. वांगे,कनिष्ठ प्रशासन अधिकारी सुहास शहाणे यांच्यासह विभागातील सर्व कर्मचारी उपस्थित होते.

बैठकीत बोलतांना निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल म्हणाले की, जनगणना हे राष्ट्रीय पातळीवरील अत्यंत महत्त्वाचे कार्य असून त्यामध्ये कोणतीही दिरंगाई अथवा हलगर्जीपणा सहन केला जाणार नाही, असे स्पष्ट निर्देश दिले. जनगणना प्रक्रियेतील प्रत्येक टप्पा नियोजित वेळेत पूर्ण करण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने व जबाबदारीने काम करावे, असेही त्यांनी सांगितले.

बैठकीत जनगणना २०२७ संदर्भातील प्राथमिक तयारी, घरगुती यादीकरण, क्षेत्रनिहाय नियोजन, अधिकारी व कर्मचारी नियुक्ती, प्रशिक्षण नियोजन, माहिती संकलनासाठी वापरल्या जाणाऱ्या तांत्रिक साधनांची उपलब्धता तसेच आवश्यक मनुष्यबळ याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. प्रत्येक तालुक्यातील कामकाजाचा आढावा घेऊन प्रलंबित बाबी तात्काळ मार्गी लावण्याच्या सूचना देण्यात आल्या.नगर परिषद व नगर पंचायत स्तरावर अद्ययावत नकाशे, प्रभागनिहाय माहिती, नव्याने उभारलेले गृहनिर्माण प्रकल्प, स्थलांतरित नागरिकांची नोंद याबाबत अचूक माहिती उपलब्ध करून देण्याचे निर्देश संबंधित मुख्याधिकाऱ्यांना देण्यात आले. ग्रामीण भागात तलाठी, ग्रामसेवक व संबंधित कर्मचाऱ्यांनी क्षेत्रभेटी वाढवून प्रत्यक्ष पडताळणी करावी, असेही सांगण्यात आले.

पपर्शुीश निहाय तयारीला वेग

जनगणना कार्यालयाच्या वतीने nnexure-I अंतर्गत ग्राम महसूल अधिकारी, ग्राम पंचायत अधिकारी, आशा वर्कर, अंगणवाडी सेविका यांच्या माध्यमातून १८० ते २०० घरांचा अथवा ६५० ते ८०० लोकसंख्येचा एक र्कीश ड्ळीींळपस इश्रेलज्ञ (क्ङइ) निश्चित करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. घरसमूह निश्चित करताना रस्ते, नद्या, पूल, शाळा, इमारती यांसारखी ओळख पटणारी स्थळे नमूद करणे आवश्यक आहे. संबंधित क्षेत्र स्लम एरिया, विशेष क्षेत्र, मिलिटरी एरिया किंवा स्पेशल चार्जमध्ये येत असल्यास त्याची स्वतंत्र नोंद करावी, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.पपर्शुीश-खख अंतर्गत प्रगणक, पर्यवेक्षक व प्रशिक्षक यांची अंतिम यादी तयार करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. संबंधित कर्मचाऱ्यांची संपूर्ण माहिती - नाव, पद,



विभाग, मोबाईल क्रमांक व ई-मेल - नमूद करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

Annexure-III नुसार निवड करण्यात आलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या संख्येनुसार प्रशिक्षण बॅच तयार करून नियोजन करावे. प्रशिक्षणासाठी ऑडिओ-व्हिज्युअल सुविधा, प्रोजेक्टर, साऊंड सिस्टीम, व्हाईट बोर्ड, संगणक आदी साधनांची व्यवस्था शाळा व महाविद्यालयांमध्ये उपलब्ध करून देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. स्लम एरिया, अधिसूचित व मान्यताप्राप्त झोपडपट्ट्या तसेच विशेष क्षेत्रे (मिलिटरी एरिया, संशोधन केंद्र, कारागृह, वसतिगृह इ.) यांची स्वतंत्र नोंद करून नियोजनबद्ध पद्धतीने माहिती संकलन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. सर्व तहसीलदार व मुख्याधिकाऱ्यांना एक्सेल शीटद्वारे आवश्यक माहिती पाठविण्यात आली असून ती तपासून तत्काळ सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

मास्टर ट्रेनर प्रशिक्षण: ९ मार्च ते १२ मार्च २०२६, पहिली बॅच -यशदा, पुणे (४ दिवस) दि. १४ मार्च १७ मार्च २०२६ यशदा, पुणे (४ दिवस)

जिल्हा/उपविभाग/तहसील/शहर/मुख्यालय अधिकारी प्रशिक्षण: २६ फेब्रुवारी ते ३१ मार्च २०२६, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना (३ दिवस)

फील्ड ट्रेनर प्रशिक्षण: ६ एप्रिल ते ११ एप्रिल २०२६, जिल्हा स्तरावर (३ दिवस)

प्रगणक व पर्यवेक्षक प्रशिक्षण: २७ एप्रिल ते ८ मे २०२६, तालुका स्तरावर (३ दिवस) चार किंवा पाच बॅचेस मध्ये. प्रत्यक्ष घरगणना दिनांक १६ मे ते १४ जून २०२६ या कालावधीत केली जाणार आहे. जनगणना २०२७ हे व्यापक व संवेदनशील कार्य यशस्वी करण्यासाठी सर्व यंत्रणांनी एकत्रितपणे काम करण्याची आवश्यकता असल्याचे अधोरेखित करण्यात आले. जनगणना प्रक्रियेत डिजिटल पद्धतीचा अधिकाधिक वापर करून पारदर्शकता व अचूकता राखण्याचे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा चार्ज अधिकारी जनगणना शशिकांत हदगल यांनी केले.

## गोर सेना जालना तालुका कोषाध्यक्षपदी अमोल पवार यांची निवड व सत्कार



**जालना । प्रतिनिधी -** तालुक्यातील पारेगाव तांडा येथील रहिवासी अमोल देवीचंद पवार यांची गोरसेना जालना तालुका कोषाध्यक्षपदी निवड झाली आहे.हि निवड राष्ट्रीय अध्यक्ष संदेश चव्हाण यांनी केली आहे. याप्रसंगी गोरसेना राष्ट्रीय अध्यक्ष संदेश चव्हाण, अंजेय चव्हाण, लहु चव्हाण, विकास चव्हाण, संदीप चव्हाण, अनिल राठोड व ईतर काही गोरसेनेचे जालना जिल्हा पदाधिकारी उपस्थित होते.हि निवड झाल्याबद्दल अमोल पवार यांना अनेक मान्यवरांकडून, मित्रमंडळी कडून शुभेच्छाचा वर्षाव होत आहे.

## अंबड येथे २१५ पदांसाठी रोजगार मेळाव्याचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार तरुण-तरुणींसाठी रोजगाराची मोठी संधी उपलब्ध झाली आहे. जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र आणि महर्षी कणाद शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अंबड यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार, दि.१३ फेब्रुवारी २०२६ रोजी भव्य 'पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे' आयोजन करण्यात आले आहे. तरी जिल्ह्यातील उमेदवारांनी रोजगार मेळाव्याच्या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा सहायक आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता यांनी केले आहे. उमेदवारांनी सोबत बायोडाटा (५ प्रती), शैक्षणिक कागदपत्रे आणि आधारकार्डच्या छायांकित प्रती घेऊन उपस्थित राहावे. मेळाव्यात सहभागी होण्यासाठी www.rojgar.mahaswayam.gov.in या पोर्टलवर नोंदणी करून 'SPECIL JOB FIR-5 (२०२५-२६) JLN' या पर्यायावर 'Apply' करणे आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी कार्यालयाचा दूरध्वनी क्रमांक ०२४८२-२९९०३३ वर संपर्क साधावा. या मेळाव्याचे खास वैशिष्ट्य म्हणजे केवळ नोकरीच नाही, तर स्वयंरोजगारासाठी अर्थसहाय्य देणाऱ्या विविध महामंडळांचे स्टॉल्स येथे लावले जाणार आहेत. रोजगार मेळाव्यात पाच नामांकित कंपन्यांचे प्रतिनिधी प्रत्यक्ष मुलाखती घेऊन निवड करणार आहेत. यामध्ये . लार्सन अँड टुब्रो ,पनवेल १२० पदे (बांधकाम क्षेत्रातील विविध पदे), साई मॅनपावर (टोयोटा प्रा. लि.), जालना: ७५ पदे, भारत फायनान्शियल इन्क्लुजन लि., जालना ६० पदे, रिद्धी सिद्धी सर्विसेस, जालना: २० पदे, देवाश्व होंडा शोरूम, २० पदांचा समावेश आहे. असे प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.